महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०६ वे | दिनांक : ११/०४/२०२६ | वार : शनिवार

## पैसे नसतील तर लाडकी बहीण योजना बंद करा- न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले



**मुंबई** : राज्यातील महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संदर्भात मोठी घडामोड समोर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या योजनेवरून राज्य सरकारला तीव्र शब्दांत सुनावले आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन व इतर लाभ देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यास ही योजना बंद करण्याचा विचार करा, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. या टिप्पणीमुळे राज्याच्या आर्थिक धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ही सुनावणी एका निवृत्त महिलेच्या याचिकेवर झाली. मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या या महिलेने सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारे निवृत्तीवेतन आणि इतर लाभ न मिळाल्यामुळे न्यायालयात धाव घेतली होती. यावर पालिकेच्या वकिलांनी कोर्टात मांडले की, या लाभांसाठी आवश्यक निधी उपलब्ध नाही, कारण राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळत नाही. यावर न्यायालयाने कठोर शब्दांत प्रतिक्रिया देत सरकारच्या प्राधान्यक्रमांवर सवाल उपस्थित केला.


न्यायालयाने विचारले की, लाडकी बहीण योजनेसाठी ४० हजार कोटी रुपये खर्च करता, मग पेन्शनसाठी पैसे कसे नाहीत? सरकारच्या या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा परिस्थितीत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे. जर निधीची कमतरता असेल, तर अशा मोठ्या योजनांचा पुनर्विचार करावा, असेही न्यायालयाने सूचित केले. या वक्तव्यामुळे राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडत असल्याचेही समोर आले आहे. या योजनेअंतर्गत सुमारे २ कोटी ४३ लाख महिलांनी नोंदणी केली होती. प्रत्येक लाभार्थी महिलेला दरमहा १,५०० रुपये दिले जात असल्याने वार्षिक खर्च सुमारे ४३,७४० कोटी रुपयांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे राज्याच्या आर्थिक संतुलनावर या योजनेचा परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

योजनेतील पारदर्शकतेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या पडताळणीत ७१ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे या महिलांना योजनेतून वगळण्यात आले. तसेच काही प्रकरणांमध्ये सरकारी कर्मचारी, तसेच महिलांच्या नावावर पुरुषांनीही लाभ घेतल्याचे आढळून आले. यामुळे योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी समोर आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने लाभार्थ्यांची सखोल पडताळणी सुरू केली आहे. पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम महिलांनाही योजनेचा लाभ मिळत असल्याचे आढळल्याने केवायसी मोहीम राबवण्यात आली. त्यामुळे मोठ्या संख्येने लाभार्थी कमी झाले आहेत. मात्र, न्यायालयाच्या निरीक्षणानंतर आता या योजनेबाबत सरकार काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## बहुमत असूनही 'प्रशासकीय' हस्तक्षेपाने सत्ता हिसकावली : पालकमंत्री शंभूराज देसाई



**सातारा** : जिल्हा परिषदेतील अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीनंतर निर्माण झालेला सत्तासंघर्ष आणखी तीव्र झाला असून पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी भाजपवर थेट निशाणा साधला आहे. बहुमत आमच्याकडे असतानाही प्रशासनाचा वापर करून सत्ता हस्तगत करण्यात आली, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

कोयना दौलत डोंगरी महोत्सवानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत देसाई यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. ही केवळ राजकीय लढत नसून 'दडपशाही' आणि 'प्रशासकीय हस्तक्षेप' यांचा परिणाम असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीत आपल्याकडे स्पष्ट बहुमत होते, हे सर्वांना ठाऊक असूनही वेगळी समीकरणे निर्माण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

मतदान प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय स्वेच्छेने घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सर्व घडामोडींची माहिती देण्यात आली होती आणि सदस्यांच्या भूमिकेनुसारच निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. व्हीप मोडणाऱ्या सदस्यांविरोधात कायदेशीर कारवाई सुरू असून संबंधित याचिका जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, दोन सदस्यांना पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप करत देसाई यांनी भाजपवर टीका केली. "सत्ता मिळवली नाही, तर आमच्याकडून हिसकावली" असा आरोप त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

आमदार महेश शिंदे यांच्या वक्तव्यालाही देसाई यांनी उत्तर दिले. एकनाथ शिंदे यांना चुकीची माहिती देण्यात आल्याचा आरोप फेटाळून लावत त्यांनी सांगितले की, महायुतीतील सर्व हालचालींची माहिती आपण नियमितपणे देत होतो. चुकीचे ब्रीफिंग केल्याचा आरोप करणाऱ्यांनी ठोस पुरावे सादर करावेत, असेही त्यांनी आव्हान दिले.

याच वेळी कोयना दौलत डोंगरी महोत्सवाच्या यशाचाही त्यांनी आढावा घेतला. सुमारे 12 हजार पर्यटकांनी बोटिंगचा आनंद घेतल्याने सव्वा कोटी रुपयांचा महसूल मिळाल्याचा दावा त्यांनी केला. भविष्यात राज्यभर अशा महोत्सवांचे आयोजन करण्यासाठी पर्यटन विभागाकडून अडीचशे कोटी रुपयांची मागणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## ऑपरेशन टायगर कुठेही अस्तित्वात नाही:सगळे खासदार उद्धव ठाकरेंच्या पाठीशी एकजुटीने उभे, अनिल देशमुख यांची प्रतिक्रिया



**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात शिवसेना ठाकरे गटाचे काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची चर्चा असून लवकरच मोठे पक्षांतर होणार असल्याचे बोलले जात आहे. त्यातच ऑपरेशन टायगर सुरू असल्याच्या चर्चा देखील सुरू आहेत. यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली.

अनिल देशमुख म्हणाले, असे आहे की या सर्व बातम्या पेरल्या जातात. त्यामुळे ऑपरेशन टायगर कुठेही अस्तित्वात नाही. आणि ज्या पद्धतीने एकजुटीने सर्व ठाकरे गटाचे खासदार उद्धवजी ठाकरे यांच्या पाठीमागे आहेत त्यामुळे असे घडणार नाही, अशी मला खात्री आहे, असे देशमुख यांनी म्हटले आहे.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाच्या खासदारांसोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बैठक झाल्याचेही बोलले जात आहे. यावर खुद्द शिंदेंनीच स्पष्टीकरण देत अशी कुठलीही बैठक झाली नसल्याचे स्पष्ट केले आहे. ते म्हणाले, गेल्या दीड वर्षांपासून अशा प्रकारच्या बातम्या मुद्दाम पसरवल्या जात आहेत. परंतु, या बातम्यांमध्ये काडीचेही तथ्य नाही. केवळ राजकीय गैरसमज आणि सनसनाटी निर्माण करण्यासाठी अशा वावड्या उठवल्या जात आहेत.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, उबाठाच्या खासदारांसोबत माझी कोणतीही बैठक झालेली नाही. अशी कोणतीही बैठक झाली नाही आणि त्या केवळ अफवा आहेत. अशा प्रकारचे वृत्त पूर्णपणे निराधार असून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, अशा पद्धतीची कुठलीही बैठक झालेली नाही, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. त्यांच्या पक्षाचे आमदार-खासदार आमच्याकडे घेण्याची गरज वाटत नाही. काही नाराजी असेल तर आमदार-खासदारांची बदनामी उबाठाच्या नेत्यांनी करू नये, असा खोचक सल्लाही म्हस्के यांनी दिला आहे.

पुढे बोलताना नरेश म्हस्के म्हणाले की, दिल्लीमध्ये महाराष्ट्रातील जवळपास सर्वच खासदार एकत्र असतात. आपल्या राज्यातील मंत्र्यांने चहा पानाला बोलावले तर जातात. प्रतापराव जाधवांकडे जेवनासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सुद्धा खासदार होते. त्यामुळे काहीही बातम्या पसरू नये. अरविंद सावंत यांचे पक्षातील विरोधक त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करत असावे. उबाठातीलच काही लोकं या अफवा पसरवत लोकप्रतिनिधींना बदनाम करत आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ एप्रिल २०२६




# तिफणकार

तिफण खांद्यावर घेऊन तो निघाला,
पण शेत बांधावरचं नव्हतं —
कागदाचं होतं पांढरंफेक रान.
शाईच्या थेंबात भिजवून शब्द,
तो पेरत गेला माणसाचं भान.

त्याच्या नांगराला धार नव्हती,
ओळींची होती वेसण.
बैल जुंपले नव्हते जुवाला,
कवितांच्या ओळीच धावत होत्या
मनाच्या माळरानावरून सुसाट.

ना कुणी मुजरा केला, ना टाळ्या,
तो गाजावाजा टाळून चालत राहिला.
एका हातात पेनाचं टोक,
दुसऱ्या हातात काळजाचा कोपरा —
दोन्हींनी तो बांधावर उभा राहिला.

'भाकरीचा' वास शब्दांतून आला,
'गावकुसा'बाहेरचं दु:ख त्यानं सांगितलं.
'इडा-पीडा' घेऊन पावसात भिजला,
'अथांग' डोहात स्वत:लाच शोधत राहिला.
' तिफण' धरताना घाम गाळला,
'बाभळी'च्या काट्यांवरून मायेनं हात फिरवला.

पोरं शाळेत म्हणतात 'आमचे सर',
लेखणीवाले म्हणतात 'आमचा गुरु',
वाचणारं काळीज म्हणतं 'आपला माणूस'.
डॉक्टरकी, प्राध्यापककी विसरून,
तो राहिला फक्त तिफणकार —
शब्द पेरता येणारा शेतकरी.

संमेलनाच्या मंचावर गेला,
तरी बोलला रानातल्या भाषेत.
सत्कारांचे हार गळ्यात पडले,
पण गरिबीला कधीच विसरले नाही.
कारण त्याला ठाऊक होतं —
पीक पदव्यांचं नसतं, घामाचं असतं.

आजही दिसतो तो बांधावर,
नव्या पानावर नवी सरी ओढताना.
एका डोळ्यात आसवांची ओल,
दुसऱ्या डोळ्यात उद्याची चाहूल.
तिफण झिजेल, हात थकतील,
पण त्यानं पेरलेल्या ओळी
काळजाच्या पडिकात
पिढ्यानपिढ्या उगवत राहतील.

कारण तिफणकार लोकमानसात अजरामर
आहे—
तो फक्त बी होऊन मातीत मिसळतो,
आणि पुन्हा शब्द होऊन उगवतो.

• लक्ष्मण वाल्डे

# डॉ. मधुकरराव वासनिक महाविद्यालयात शिक्षक पालक सभेचे आयोजन



**नागपूर (प्रा. डॉ. चंद्रशेखर पाटील) :** स्थानिक पी.डब्ल्यू. एस. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर येथे नुकतीच शिक्षक पालक सभेच्या वतीने शिक्षक पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.प्रज्ञा बागडे उपस्थित होत्या.सभेच्या मार्गदर्शन पॅनल मध्ये प्रा. डॉ मनीषा नागपूर (मराठी विभागातील प्रमुख) ,प्रा. डॉ सुदेश भोवते (इंग्रजी विभाग प्रमुख) , प्रा. डॉ .विवेक चौहान (वाणिज्य विभाग प्रमुख), प्रा. डॉ .सुमेध नागदेवे ( हिंदी विभाग प्रमुख) ,यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की विद्यार्थी व पालकांमध्ये संवाद कायम राहिले पाहिजे, व नव्या शैक्षणिक धोरणांबद्दल माहिती दिली कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुशांत चिमणकर तर प्रास्ताविक समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी केले. शिक्षक पालक सभेमध्ये संबंधित पालकांनी काही समस्या मांडल्या व काही सूचनाही दिला. महाविद्यालयाच्या प्रा.डॉ .प्रज्ञा बागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महाविद्या- लय मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेकरिता महाविद्यालयाच्या मार्फत मार्गदर्शन मिळते. स्वयंरोजगारांच्या विविध संधी आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना नेहमी जागृत राहून महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधा, ग्रंथालय ,क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना , सांस्कृतिक उपक्रमा विषयी विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासा संबंधित विविध उपक्रमा विषयी माहिती दिली. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी नरेश साखरे यांनी सम्यक थिएटर द्वारा निर्मित महानाट्य महासुर्य मध्ये विद्यार्थी सहभागी व्हावेत व सांस्कृतिक चळवळ मजबूत करावी असे आव्हान केले. कार्यक्रमाचे आभार नव समन्वयक प्रा. डॉ. मेघा रामटेके यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ एप्रिल २०२६


## परीक्षेची भीती

मार्च महिना लागताच
परीक्षा होते सुरू
कोणकोणत्या विषयाचा
किती अभ्यास करू ?

इंग्रजीचे शब्द
होत नाही पाठ
स्पेलिंग मिस्टीकची
शक्यता असते दाट

मराठी व्याकरणाची
वाटते खूप भीती
डोकं चक्रावून जाते
जेव्हा पेपर पडतो हाती

आकृत्या काढतांना
कंटाळवाणा वाटतो भूमिती
पाढे पाठ करण्याची
वाढत नाही गती

इतिहासातले जन्म मृत्यू
राहत नाही ध्यानात
गृहपाठ केला की नाही?
गुरूजींचे वाक्य कानात

अभ्यास न केल्याने
पेपर जातात कोरे
परीक्षा नसती तर
किती झाले असते बरे !




**- रवींद्र चालीकवार**
मु. पो. ता. महागाव
जि. यवतमाळ
मो. ९०११५५९१०६


# द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त म. फुले यांच्या विचारांचा जागर मांडू...

**भा**रताच्या सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक इतिहासाचा निर्भीड आणि निष्पक्ष वेध घेतला तर एक अत्यंत अस्वस्थ करणारे सत्य समोर येते. ते म्हणजे या देशाने आपल्या सर्वात मूलगामी, दूरदृष्टीच्या आणि मानवमुक्तीवादी समाजक्रांतिकारकांपैकी एक असलेल्या महात्मा जोतीराव फुले यांना दुर्लक्षित केले आहे. एवढेच नाही तर त्यांच्या विचारांना जाणीवपूर्वक मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले आहे. प्रस्थापित सत्ताधारी विषम विचारसरणीच्या हितसंबंधातून रचलेला हा सुनियोजित कट आहे. बहुजन समाजाला दुय्यम ठेवण्यासाठी सत्ताधारी व्यवस्थेने यासाठी ज्ञान, धर्म आणि सत्तेचाही बखुबीने वापर केला आहे.आज भारत आणि विशेषतः महाराष्ट्र ज्या वळणावर उभा आहेत तिथे विकासाच्या घोषणांमागे सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे वास्तव लपवले जात आहे. प्रसार माध्यमाच्या जोरावर प्रगतीची भाषा मोठ्या आवाजात बोलली जात आहे पण लोकांच्या प्रश्नाला शांतपणे बगल दिली जात आहे. शिक्षणाच्या विस्ताराचा भास निर्माण करुन त्याचा अभिमान बाळगला जात आहे पण त्या शिक्षणात विचारशक्तीचा अभाव स्पष्टपणे जाणवतो आहे. सामाजिक न्यायाच्या तत्वाला तीलांजली देत आधुनिक आणि प्रगत झालेला समाज आपल्या महापुरुषांना तरी मान्य झाला असता का कळीचा प्रश्न आहे.म. फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते. ते व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारे क्रांतिकारक होते. त्यांनी जे प्रश्न उपस्थितकेले ते आजही अनेकांना अस्वस्थ करतात. जातिव्यवस्था का टिकते ? स्त्रीदास्य का ठेवले जाते? ज्ञानावर मक्तेदारी कोणाची आणि का असते? आणि माणूस माणसासारखा का जगू शकत नाही? हे प्रश्न साधे नव्हते, ते सत्तेला हादरवणारे होते. म्हणूनच म. फुले स्वीकारले गेले नाहीत, तर नियंत्रित केले गेले. त्यांच्या विचारांना समाजात रुजू दिले गेले नाही. भारतीय समाजातील सर्वात मोठी समस्या आहे, ज्याला म. फुल्यांनी 'गुलामगिरी' म्हटले होते. गुलामगिरी ही केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक आणि वैचारिक असते. विचार करण्याची क्षमता जिथे हरवते तिथे गुलामगिरी जन्म घेते. 'गुलामगिरी' या ग्रंथातून फुल्यांनी स्पष्ट केले की, जातिव्यवस्था ही फक्त सामाजिक विभागणी नाही तर ती एक मानसिक यंत्रणा आहे, जी माणसाला माणसाविरुद्ध उभे करते. धर्म, परंपरा आणि संस्कृतीच्या नावाखाली ही यंत्रणा इतकी खोलवर रुजवली आहे की अन्याय सहन करणे हेच कर्तव्य असल्याचे वाटत आहे. आजचे वास्तव तर जास्त धोकादायक आहे. कारण आज गुलामगिरी उघड नाही, ती छुपी आहे. ती शिक्षणात आहे, माध्यमांत, बाजारात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणसाच्या विचार आणि दृष्टिकोनातही आहे. बहुजन समाजाला प्रगतीची आस दाखवली जाते, पण प्रत्यक्षात त्याला सत्ता, ज्ञान आणि संसाधनांपासून दूर ठेवले जात आहे.गुलामगिरीचा दुसरा पैलू म्हणजे आर्थिक शोषण. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातून म. फुल्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाचे जे चिकीत्सक विश्लेषण केले, ते आजही तितकेच लागू पडते. शेतकरी हा उत्पादनाचा केंद्रबिंदू आहे, पण त्याला त्याच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळत नाही. सत्ता, बाजार आणि व्यवस्थेचे संगनमत त्याला सतत कर्जाच्या आणि असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलते. सततच्या शेतकरी आत्महत्या हे त्याचेच दृष्य परिणाम आहेत.अंधश्रद्धा, अज्ञान आणि अंधानुकरण हे या व्यवस्थेचे सर्वात मजबूत आधार आहेत. 'तृतीय रत्न' या नाटकातून म. फुल्यांनी अधोरेखित केले आहे की, शिक्षणाअभावी माणूस सहजपणे कसा नागवला जातो. नवनवीन स्वरूपात अंधश्रद्धेला कसे जिवंत ठेवण्याच काम केले जाते याचे दर्शन या नाटकात आहे. या नाटकामधील परिस्थिती आजही बदललेली नाही हे नुकतेच उघड झालेल्या नाशिक येथील भोंदुबाबा अशोक खरात प्रकरणाने सिध्द केले. अंधश्रद्धा केवळ ही केवळ धार्मिक नाही, ती आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि डिजिटल स्वरूपातही आहे हे खरात प्रकरणाने दाखवुन दिले. माणूस माहिती तंत्रज्ञानाच्या युगात असूनही विवेकशून्य वागतो. माध्यमे आणि डिजिटल यंत्रणा मिळून सत्य आणि असत्य यामधील सीमारेषा धूसर करत आहेत. राजकीय नेते याला कसे प्रोत्साहन देतात आणि आपल्या राजकीय फायद्यासाठी कसा याचा वापर करतात याचेही ओंगळवाणे दर्शन यातुन झाले आहे. म. फुल्यांची सर्वात मोठी देणगी म्हणजे त्यांनी समाजाला 'प्रश्न विचारण्याची, तर्क करण्याची संस्कृती' दिली. ज्या समाजात प्रश्न विचारले जात नाहीत, तिथे सत्तेला कधीही उत्तर द्यावे लागत नाही आणि जिथे सत्तेला उत्तर द्यावे लागत नाही, तिथे अन्याय कायम राहतो. "अगर सडके खामोश हो जाए तो संसद आवारा हो जाएगी" असे डॉ. राम मनोहर लोहिया यांनीही म्हटले आहे. ते आजही जसंच्या तसे लागु पडते. प्रश्न विचारणाऱ्यांकडे संशयाने पाहिले जात आहे, प्रसंगी त्यांना देशद्रोही सुध्दा ठरविले जात आहे. म. फुले यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुल्यांच्या सहकार्याने उभारलेले शिक्षणकार्य हे केवळ शाळा उघडण्यापुरते मर्यादित नव्हते तर ते विशिष्ट जातीच्या ज्ञानाच्या मक्तेदारीवर थेट प्रहार करणारे होते. ज्या समाजात स्त्रीला शिक्षणबंदी असते, तिथे ती केवळ सामाजिकच नव्हे, तर मानसिक गुलाम बनते. फुले दाम्पत्यांनी त्या काळात शिक्षणाच्या माध्यमातुन गुलामगिरीचा साखळदंड तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रस्तापित सत्ताधारी वर्ग 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' लागु करुन गुलामगिरीचा हा साखळदंड जोडण्यासाठी प्रयत्नरत आहे. परीणामी पटसंख्येच्या नावाखाली महाराष्ट्रातील शाळा बंद केल्या जात आहेत. या माध्यमातुन शिक्षणाचे खाजगीकरण, कार्पोरेटीकरण करुन बहुजनांची शैक्षणिक कत्तल करण्याचा जणु अजेंडा राबविण्यात येत असल्याचा सप्रमाण आरोप शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक रमेश बिजेकर यांनी केला आहे.येणारे वर्ष हे म. फुले यांचे व्दिशताब्दी जयंती वर्ष साजरे होत आहे.

एक उत्सव म्हणून महात्मा फुल्यांची जयंती आपण जरुर साजरी केली पाहिजे. पण एक समाजक्रांतिकारक म्हणून त्यांना, त्यांच्या साहित्याला समजून घेणे तेवढेच गरजेचे आहे. त्यांच्या विचारांना समजुन न घेता, ते आपल्या आचरणात न आणता आपण म. फुल्यांचे अनुयायी आणि वारसदार ठरतो का हा प्रश्न स्वतःलाच विचारण्याची वेळ आली आहे.


**राम श्रृंगारे, वाशिम**
प्रभाकर गायकवाड, छ. संभाजीनगर




**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**


**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ एप्रिल २०२६

# मानवतेची समताधिष्ठित संस्कारमूल्ये रूजविणारा "बावीस प्रतिज्ञा" : विद्रोही कवी साहेबराव मोरे




उन्नतीचा सम्यक मार्ग दाखविणारा सुधारक धर्म आहे. आज जगाला युद्ध नको बुद्ध हवा. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १४आक्टो १९५६ रोजी धम्मदीक्षा घेऊन जागतिक स्तरावर सामाजिक समतेसाठी चे मानवमुक्तिचे क्रांतिकारक पाऊल टाकले. नवबौद्धांची समकालीन आव्हाने लक्षात घेऊन, त्याबरहुकूम अनुयायांना २२प्रतिज्ञा दिल्या. ह्या प्रतिज्ञा बौद्धांसाठी सांस्कृतिक रक्तवाहिन्या आहेत धर्मांतरावेळी त्यांनी संपूर्ण भारत बौद्धमय करीन ही प्रतिज्ञा व संकल्प सोडला. भारतीय राज्यघटनेच्या पानापानांत बाबासाहेबांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची पेरणी केली. संविधानाचा मूलाधार स्वातंत्र्य,समता, बंधुता आहे. धर्मांतराच्या काही महिन्यांपूर्वी, २३ एप्रिल १९५६ रोजी हिंदू धर्माची त्यागप्रतिज्ञा त्यांनी जाहीर केली होती. देव देवता नाकारणाऱ्या तिन प्रतिज्ञांचा हा जाहीरनामा होता .नंतर धम्मदीक्षा सोहळ्याला २२ प्रतिज्ञांचे प्रतिज्ञापत्र सादर केले. २२ प्रतिज्ञांचे तंतोतंत पालन म्हणजे बौद्ध होय. पूर्वीच्या महार समाजात आमूलाग्र बदल झाला आहे. बौद्ध वस्तीतल्या विहारात धम्मपालनआचरणाचे शिबिर आयोजित केले जातात. त्रिशरण, पंचशील,अष्टांग मार्गाचा अवलंब केला जातो, तथापि २२ प्रतिज्ञां चे पालन करण्यापासून समाज दुरावतो आहे . राजकीय व्यवस्थेला वश होऊन सामाजिक धृव्रीकरण होते आहे . हिंदू -बौध्द धर्माची भेसळ समाजाला बौद्ध बनन्यातला प्रमुख अडसर ठरते आहे. सत्तेत वाटेकरी होण्यासाठी नेते बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या तत्वांना हरताळ फासताहेत.२२प्रतिज्ञा घरा घरात व घरातील प्रत्येक सदस्यांना अवगत होण्यासाठी "कवितामय बावीस प्रतिज्ञा" हा कवयित्री संघमित्रा गेडाम यांचा कविता संग्रह प्रकाशित झाला आहे. बौद्ध ही विस्तृत व व्यापक संकल्पना आहे त्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या "कास्टस् इन इंडिया", "ॲनिहेलेशन ऑफ कास्टस्", "दी बुद्ध अँन्ड हीज धम्म" या ग्रंथांचे वाचन अनिवार्य आहे. या सर्व ग्रंथांचा वैचारिक प्रवास २२ प्रतिज्ञांमधूनच प्रतिबिंबित झालेला आहे. या प्रतिज्ञा काव्य रूपात सोप्या भाषेत परंतु मूळअर्थाला स्पर्श न करता, समाजातील सर्व घटकांना समजतील अशा शब्दांत काव्यसंग्रहाच्या गेयपुर्ण माध्यमातून कवयित्री जे संघमित्रा गेडाम यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत. सुप्रसिद्ध आंबेडकरी विचारवंत यशवंत मनोहर यांनी ब्लर्ब मध्ये काव्यसंग्रहाचा अचूक वेध घेतला आहे. ,"२२प्रतिज्ञा ही एकूणच विश्वधमम्माची प्रतिभावंत उद्देशिका आहे. धम्माचा सर्वगामी महाबोधी वृक्ष या प्रतिज्ञा मध्येच वास्तव करतो आहे". धम्म चळवळ सन्मार्गावर प्रवाहीत ठेवण्यासाठी हा काव्यसंग्रह उद्बोधक ठरेल असा विश्वास वाटतो. कवितामय बावीस प्रतिज्ञा म्हणजे धम्म उपासकांसाठी काव्यात्म प्रकाश शलाका आहे. दीप ध्वज कोसोदे यांची प्रस्तावना गेडाम यांच्या धम्म कार्याची धडपड अंकीत करते. १ते६ प्रतिज्ञा देवदेवतांचे दैवी अस्तित्व नाकारुन विज्ञाननिष्ठ सत्यशोधक समाज निर्मितीसाठी प्रेरणा देतात. कर्मकांड व अंधभक्तीचे जाहीर खंडन करताना गेडाम लिहितात, ,"२२प्रतिज्ञा आहे विचार समाजागृतीचा नाराअंधश्रद्धा नाकारून बुद्ध धम्म स्वीकरा" अंधश्रद्धेच्या थोतांडापासून मुक्ती देणारा हा जगतश्रेष्ठ धम्म आहे.आठव्या प्रतिज्ञेच्या मूलस्थानी हा विचार अग्रणी आहे," क्रिया, कर्मकांड ब्राह्मणी उच्छाद माजवीआणीबाणीच्या लोभानेमनुष्य प्राण्याला फसवी"(पृ २१) माणसाला गुलाम बनविणाऱ्या ब्राह्मण कुटनितीचे उच्चाटन समताधिष्ठित मानवता उजागर करण्याचा , माणूस निर्मिती चा सद धम्म म्हणजे बौद्ध धम्म.नवव्या प्रतिज्ञेत मनुष्य मात्राच्या सामाजिक समतेसाठी समसमान तत्व अधोरेखित केले आहे ."स्पृश्य- अस्पृश्य स्त्री भेदाभेदीमानवतेच्या इथे तोडल्या भिंतीस्वातंत्र्य समता न्याय बंधुता रूजण्या येथे बुद्धच सांगाती" (पृ २३)कवयित्रीने जनसामान्यांच्या भोषेतील सोप्या रचनेत केलेली मांडणी लक्षवेधी ठरली आहे प्रतिज्ञा १३ते१७ पंचशील अनुपालन, आचरणातून सम्यक जीवनमार्ग अनुसरणाची संहिता दिलेली आहे शेवटी १८ ते २१ प्रतिज्ञांमध्ये सदाचारी, सदाचरण जीवनमूल्याची केलेली कसदार पेरणी जीवन पूर्ण तृप्त करण्यासाठी उचित दिशादर्शन करणारी आहे. प्रत्येक प्रतिज्ञेवर डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षा सोहळ्यात अभ्यासपूर्ण भाष्य केलेले आहे. हा बुद्धिजीवी लोकांना बुद्धांकडे नेणारा सर्व समावेशक राजमार्ग आहे.या भारत खंडात बुद्ध विचारांतून मन्वंतर घडेल याची खात्री बाबासाहेब आंबेडकरांनी भाषणात दिलेली आहे .शेवटी २२ वी प्रतिज्ञा बुद्ध शिकवणीनुसार वागणूक, वर्तन चोख ठेवण्याची निर्णायक प्रतिज्ञा आहे,हा संदेश अंगी बिंबविण्याचे आवाहन कवियत्री करतांना व्यक्त होते," बहुजन हिताय बहुजन सुखाय हाच बुद्धांचा संदेश मंगल मैत्री करून स्विकारु बाबांचा आदेश" (पृ३५)बुद्ध धम्म म्हणजे स्वयं प्रकाशित होणंमानवी जीवनाचे अंतिम साफल्य मोक्षप्राप्ती, आसक्त मोहमयी जंजाळातून मूक्ति मिळवण्यासाठी पूर्वीच्या कुप्रथा, अंधश्रद्धांचे निर्दालन अटळ ठरते सामाजिक समता हे अमोल अस्त्र संविधान कारांनी आरक्षण रूपाने दिले.आज राजकीय पटलावर जातिपातिच्या भिंती अभेद्य करुन माणसाला गुलाम बनविणाऱ्या धर्ममार्तंडी तटबंदी मजबूत करण्यासाठी अशा दंभाला राजाश्रय मिळत आहे , आरक्षणाचे अस्त्र नष्ट करून सर्व हारा समाज पुन्हा वर्णाधिष्ठित अमानुष व्यवस्थेत भरडण्याचे षटयंत्र रचले जात आहे.जातिभेदाची मुळे मूळा संकट उखडून टाकण्यासाठी बौद्ध धम्म हा एक रामबाण उपाय आहे. यासाठी हा काव्यसंग्रह बोलीभाषेसह प्रमुख भाषांमध्ये अनुवादित व्हायला हवा.. लोकशाही जिवंत राहण्यासाठी गेडाम यांच्या बावीस प्रतिज्ञा काव्यसंग्रहाचे दस्तऐवजरूपाने वाचन अनिवार्य.काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ हीच जाणीव चिरंतर करून देते. हा संग्रह कुटुंबात सामाहिक वाचवा असे आवाहन करतो.आंबेडकरी साहित्य निर्मितीसाठी कवयित्री संघमित्रा गेडाम यांना मंगलमय शुभेच्छा देतो!!!



**समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरे**
**संवाद:९४०४०४८६०१कवितामय बावीस प्रतिज्ञा: काव्यसंग्रह**
**कवयित्री:संघमित्रा गेडाम**
**प्रकाशन : बोधीपर्व, संभाजीनगर**
**मूल्य:१२०/**

# तू आलास

तू आलास घेऊनी विचार समता अन् मानवतेचे,
रंजल्या गांजल्या प्रत्येकाला रूप दाविले अस्मितेचे.

तू उघडले दार ज्ञानाचे मायबहिणीचे भाग्य उजळले,
महिला शिक्षणाचा वारसा जगा मिळाला तुझ्यामुळे.

मानवतेचा तू पुजारी दलितांचा आवाज तू,
समाजक्रांतीचा अग्रदूत अन् वेदनेचा हुंकार तू .

या भूमीवर उगवलेला विचारांचा सूर्य तू,
साहित्याचा महामेरू वादळांचा वंशज तू .

अंधाराला तू म्हणाला पळ आता सूर्य उगवला,
ज्ञानज्योतिच्या सोबतीला सवित्रीचा त्याग लाभला.

ब्राह्मणाचे कसब सांगूनी शेतकऱ्याचा आसूड घेऊनी,
गुलामीतून केले मुक्त इथल्या अज्ञानी जणांना.

शेतकऱ्यांचा तू आवाज पहिला कष्टकऱ्यांचा भाग्यविधाता,
संप मोर्चे आंदोलनाचा तूच इथला जन्मदाता.

रायगडावरील शिवसमाधी तूच दाविली महाराष्ट्राला,
सर्वाआधी तू साजरा शिवजन्माचा उत्सव केला.

आद्य पोवाडा शिवरायांचा रचुनी तू इतिहास केला,
कुळवाडीभूषण शिवरायांचा स्वराज्याचा वीर मावळा.

दिन दलितांचा तू कैवारी आद्य सुधारक या मातीचा,
रंजल्या गांजल्या प्रत्येकाला मंत्र दिला अस्मितेचा.

तू निर्मिल्या इथे माणुसकीच्या पायवाटा,
बहुजनांना शाळेच्या तूच दाखविल्या वाटा.

युगायुगाचा अंधार मिटला ज्ञानसुर्याचा उदय झाला,
तूच विठ्ठोबा महामानवा ज्ञानपंढरीत शोभला...

**ज्ञानेश्वर गायके.**
**कन्नड**

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ एप्रिल २०२६


## स्पर्श मैत्रीचा

प्रत्येकाच्या जीवनात
स्पर्श मैत्रीचा असावा
मित्रा सोबत जगतांना
खंत कशाचाच नसावा. १

मित्र असतो जिवलग
सत्य दाखवणारा आरसा
कितीही येऊ दे संकटे
फरक पडत नाही फारसा. २

स्पर्श मैत्रीचा असतो
दु:खात पुढे धावणारा
संकट काळात स्वतः
निस्वार्थपणे पावणारा. ३

जात पात विसरून सारे
जिवापाड जपणारा
दु:खाच्या काळात धावून
सुखात मागे लपणारा. ४

स्पर्श असतो मैत्रीचा
जीवनास आधार देणारा
सुख दु:खात साथ देऊन
सदा विकासाकडे नेणारा. ५

**नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## राज्य स्थापनेनंतर मागासलेपण हिरावल्याचे राज्य शासनाचे मत



**मुंबई (प्रतिनिधी) :** स्वातंत्र्या पूर्वी महाराष्ट्रराज्यात त्याचप्रमाणे मध्य भारतात वास्तव्यास असलेल्या मराठासमुदायाचा समावेश मागासलेल्या वर्गांच्या यादीत करावा, अशी शिफारस काका कालेलकर यांच्यापहिल्या मागासवर्ग आयोगाने केली होती. परंतु, १९५६च्या राज्यपुनर्रचना अधिनियम कलम ८च्या तरतुदीं नुसार मुंबई राज्याचीपुनर्रचना केली. या नवीनराज्यामध्ये तत्कालीन मध्य भारतातील विदर्भाचे आठ जिल्हेआणि लगतचे पाच जिल्हे समाविष्ट केले. परंतु, त्यावेळी कालेलकर आयोगाने या भागांतीलमराठा समुदायाबाबतकेलेल्या शिफारशीचा पुनर्विचार केला नाहीआणि मराठा समाज मागासवर्ग श्रेणीत समाविष्ट होण्यापासून दूरच राहिला,अशी मांडणी राज्य सरकारने ८ एप्रिल २०२६ रोजी उच्च न्यायालय मुंबईत केली.स्वातंत्र्यानंतर,मराठ्यांचाउत्पन्नाचा मुख्य स्त्रोत शेती हा होता.जमिनीच्या तुकड्यांचे विभाजन, शेतीतून मिळणाऱ्याउत्पन्नात झालेली घट, शेतीशी निगडित पारंपरिक प्रतिष्ठेचा -हासआणि शेतीसाठी आवश्यक संसाधनांचा अभाव यासारख्याअनेक कारणांमुळे, मराठा समाज अधिकाधिक उपेक्षित म्हणजेच मुख्य प्रवाहा बाहेर गेला. त्यानंतर १९९१ मधील आर्थिक सुधारणांमुळे मराठा समाजाच्या दुरवस्थेत अधिकच भर पडली. ठरावाचा परिणामत्यावेळच्या मुंबई सरकारने १९४२ चा ठराव रद्द करून,समाजांचे प्रगत, मध्यम आणि मागास वर्गअशा गटांमध्ये केलेलेतत्कालीन वर्गीकरण संपुष्टा आणले. तसेच, शासनांतर्गत सेवांमधील भरती प्रक्रियेच्या उद्देशाने,अनुसूचित वर्गात समाविष्ट असलेल्या समाजांना मागास म्हणून मानले जावे, असे आदेशदिल्याकडेही साठ्ये यांनीन्यायालयाचे लक्ष वेधले.माजी न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या मागासवर्ग आयोगाने मराठासमाजाला आरक्षण देण्याची शिफारस करताना या ठरावाचामराठा समाजासह इतरही विविध समाजांवर अत्यंत सखोल परिणामझाल्याचे नमूद केले होते.या ठरावाने सार्वजनिकसेवांमधील आरक्षणाचे निकषच नव्याने परिभाषित केले होते, असे महाधिवक्ता मिलिंद साठ्ये यांनी सांगितले.आरक्षण तर्कसंगतचआणि मराठा समाजाच्या सामाजिक स्थितीचे पुनरावलोकन एम जीगायकवाड यांच्या अहवालानंतर शुक्रे आयोगाची स्थापना होण्यापर्यंत करण्या पर्यंतच्या काळात, जवळपास पाच वर्षांचा कालावधी लोटला होता.मागासवर्गीयांच्या संपूर्ण यादीचे पुनरावलोकन दर १० वर्षांच्या अंतरानेकरण्याचे अपेक्षित असते. या पार्श्वभूमीवर मराठा समाजाच्या सामाजिक स्थितीचे पुनरावलोकन करणे हे पूर्णपणे वाजवी आणि तर्कसंगत असल्याचादावाही महाधिवक्त्यांनी केला.या सुधारणांचे आर्थिक लाभ या समाजापर्यंत पोहोचलेच नाहीत. यापरिस्थितीमुळे मराठा समाजाचा मोठा वर्ग, उपलब्ध होईल ते कामशोधू लागला.विशेषत: कोणत्याही शैक्षणिक पात्रतेची आवश्यकतानसते अशी कष्टाची कामेशोधण्याच्या उद्देशाने शहरी भागांकडे स्थलांतर करण्यास भाग पडला, असा दावाही महाधिवक्तामिलिंद साठ्ये यांनी मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणिशिक्षणात दहा टक्के आरक्षण देणे गरजेचे का आहे हे न्यायालयालापटवून देताना केला.मराठा समाजाची ही अधोगती किंवा पिछाडीकेवळ स्वतंत्र व विलगघटकांच्या स्वरूपात न पाहता, ऐतिहासिक कालखंडातील एका अखंड व सातत्यपूर्णप्रक्रियेचा भाग म्हणून पाहणेआवश्यक असल्याचेही त्यांनीन्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणिन्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या विशेष पीठापुढे युक्तिवाद करतानासांगितले.मराठा समाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचिका करता ज्येष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांचे वतीने विधिज्ञ श्रेयश देशपांडे, विधिज्ञ मधुर गोलेगावकर,विधिज्ञ पद्मासिंह पाटील आदी कामकाज पाहत आहेत.या वेळी मराठा समाजाचे विविध जिल्ह्यातील समाज बांधव मोठया संख्येने उपस्तिथ होते त्यात प्रामुख्याने रामचंद्र शेडगे,अनिल सुर्वे, संतोष शेजवळ,सुभाष देसाई, शैलेंद्र शिंदे,सुशील निकम बळवंत गायकवाड,दिनेश पवार,सूर्याजी सोनावले,संतोष दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयात मराठा समाजाच्या वतीने अनवाणी असलेले जेष्ठ अभ्यासक मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील रामचंद्र शेडगे, संतोष दळवी सुभाष देसाई, प्राचार्य तांबे,प्रा.अंबादास मोहिते एवढेच मान्यवर उपस्थित राहतात हे विशेष होय.मराठा समाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या साठीजेष्ठ अॅड.अनिल गोलेगावकर,अॅड.श्रेयस संजीव देशपांडे, अॅड. मधुर अनिल गोलेगावकर व अॅड पद्मासिंह पाटील हे कामकाज पहात असून,अॅड श्रीराम पिंगळे,अॅड सूर्यजीत चव्हाण,बजरंग सोळंके, विशाखा शेलार,अॅड रूपेश बोबडे, अॅड श्रद्धा नाकाडी या सह अनेक विधीज्ञ कामकाज पहात आहेत.

## जेइएस मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहा निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन




**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताह निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी महामानव, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनपटावर भाष्य केले . शिका, संघटित व्हा ,संघर्ष करा या त्रिसूत्रीचा वापर करून समाजाची सर्व स्तरावर उन्नती कशी होईल याविषयीचे आपले विचार डॉ . अग्निहोत्री यांनी व्यक्त केलेत. यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना उपप्राचार्य डॉ महावीर सदावर्ते, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड, प्रा ज्ञानेश्वर धनवे, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, कार्यक्रमाधिकारी प्रा. किशोर तापडिया,प्रा. समाधान पवार , कार्यालयीन अधीक्षक श्री. बाबाजी साळुंखे आदि तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुग्रीव वासरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. बाबासाहेब वाघ यांनी मानले.


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ एप्रिल २०२६


## संस्कृतचा गौरव : पाठक महिला महाविद्यालयाच्या २० विद्यार्थिनींना राष्ट्रीय शिष्यवृत्ती




**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालयाने संस्कृत क्षेत्रात आपले वर्चस्व कायम राखले आहे. केंद्रीय संस्कृत विद्यापीठ (राष्ट्रीय संस्कृत संस्थान), नवी दिल्ली यांच्या वतीने देण्यात येणारी प्रतिष्ठित राष्ट्रीय शिष्यवृत्ती यावर्षी महाविद्यालयातील एकूण २० विद्यार्थिनींना जाहीर झाली आहे.भारतीय विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषा आणि साहित्याची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने ही शिष्यवृत्ती दिली जाते. शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी वरिष्ठ महाविद्यालयातील १९ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील १ विद्यार्थिनी या मानकरी ठरल्या आहेत. विशेष म्हणजे, २०१५-१६पासून सलग ११ वर्षांपासून या महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाला हे यश प्राप्त होत आहे.असे आहे शिष्यवृत्तीचे स्वरूप:या योजनेंतर्गत वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना प्रत्येकी ८,००० रुपये, तर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनीला ६,०००रुपये शिष्यवृत्ती स्वरूपात मिळणार आहेत.यशस्वी विद्यार्थिनी: शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्यांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाची तृप्ती परदेशी तर वरिष्ठ महाविद्यालयाच्या भार्गवी मोदी, राधिका दैठणकर, उन्नती उमरकर, प्राजक्ता सरोने, खुशी बताडे, ऋषिका शेंडेवाले, पायल मगरे, हर्षदा वाहुळ, दीपा भगत, प्रतिभा तेली,अंजली मुळे,अनिता ढेकले, स्तुती गायकवाड, तेजल अग्रवाल, धनश्री पिंपळे, नयन देशपांडे,साक्षी नागरगोजे,वैष्णवी गायकवाड, तनुजा पळसकर यांचा समावेश आहे.या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी संस्कृत विभागप्रमुख डॉ. मीनल श्रीगिरीवार, प्रा. माधुरी भावसार, डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी यांच्यासह सर्व विद्यार्थिनींचे विशेष अभिनंदन केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर


अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


# "महात्मा फुले यांचे व्यसनमुक्ती विषयक विचार!"

महात्मा ज्योतिराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला.तरुणांनी व्यसनापासून दूर राहून चांगले आरोग्य प्राप्त केले पाहिजे,या मताचे ते होते.महात्मा फुले हे लहुजी वस्ताद साळवे यांच्या तालमीत जाऊन युवकांना व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला द्यायचे. जोर,बैठका, कुस्ती,मल्लखांब या क्षेत्रात ते पारंगत होते. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही तसेच सामाजिक क्रांती शक्य नाही,म्हणून त्यांनी मनापासून भरपूर अभ्यास केला.एकदा मळ्यातून उसाची मोळी घेऊन येताना त्यांनी पाहिले की, गोरे दारुडे सैनिक दारू पिऊन लोकांना शिव्या देतात,धिंगाणा घालतात.याचा राग त्यांना आला.त्या सैनिकांनी त्यांच्या खांद्यावरील मोळीतील ४ ऊस उपसून घेऊन,त्यांना ढकलून दिले.ज्योतिबा त्यांच्यावर धावले आणि उसाने त्यांना फोडून काढले.सैनिक पळून गेले.लोकांनी ज्योतिबांना डोक्यावर घेऊन नाचले आणि म्हणाले,"शाब्बास संत वीरा! त्यांना असाच धडा दिला पाहिजे."ज्योतिबांनी अखंड लिहिले. बहुजन समाज शिकला पाहिजे, व्यसनमुक्त झाला पाहिजे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी अनिष्ट रूढी-परंपरा यावर हल्ला चढविला. छ.शिवरायांच्यावर ९०८ओळीचा जगातील पहिला पोवाडा लिहून, जगातील पहिली शिवजयंती १९ फेब्रुवारी १८६९ ला साजरी केली.दारुड्याच्या दुर्गुणांवर प्रकाशझोत टाकताना ज्योतिबा म्हणतात,दुर्गुणांचा छंद ज्यास बा लागला।भिक्षा घालण्याला पात्र नाही॥खोटा बोलणारा मद्यपी निव्वळ।घाली ना अगळ तर्कटास॥इंग्रजी शिक्षण घेऊन सत्याची कास धरावी,मात्र व्यसनाचा १००% त्याग करा,असा संदेश देताना ज्योतिबा लिहितात-इंग्रजी लिहावे भाषण करावे।जगात त्यागावे व्यसनास॥ चाळीशीच्यावर त्यांनी दीक्षा घ्याव्या।शाळा तपासाव्या गावोगावी॥सत्यधर्माचा महिमा पुन्हा सांगण्याचा मोह ज्योतिबांना सुटत नाही,याबाबत ते म्हणतात-यवनी लिहावें भाषण करावे।सर्वस्वी त्यागावे व्यसनास॥चाळीशीच्या वर ज्यानी दीक्षा घ्याव्या।शाळा तपासाव्या नगरीच्या॥सुमिशीया सर्व करा सत्यवादी।त्याची जहामर्दी जगाठायी॥जगा माजी एक सत्यधर्म खासा।सर्वत्रांसा ज्योती म्हणे॥दुर्गुणांची साथ सोडून कल्याणकारी मार्गाची कास धरण्याचा सल्ला देताना ज्योतिबा म्हणतात-मातापित्यामुळे होईना कुलीन।दुर्गुणाची खाण जगामाजी॥द्रव्याच्या बळाने दारूस सोडीना।पाळी व्यसनांना लाज गेली॥दुसऱ्यांना व्यसनाच्या आहारी ढकलून देणाऱ्या कुनीतीबद्दलही ज्योतिबा पोटतिडकीने टीका करतात-खोटे बोलूनी मां अज्ञान्या पिडणे।लुटूनियां खाणे भावंडास॥ विश्वासघाताने मित्रास नाडणे ही नव्हेत लक्षणे।सज्जनांची॥धंदा कलालाचा कुटुंब पोरुणे।मद्यपी करणे मुलीमुलां॥मानवाचा सत्यधर्म खरी नाती।बाकीची कुनीती ज्योती म्हणे॥दारूवरचा पैसा चांगल्या कामासाठी खर्च करावा असा आग्रह ज्योतिबा करताना-थोडे दिन तरी मद्य वर्ज्य करा।तोच पैसा भरा ग्रंथासाठी॥ग्रंथ वाचीतांना मनी शोध करा।देऊं नका थारा वैरभावा॥दारुड्याच्या मूर्खपणामुळे कुटुंबाला भोगाव्या लागणाऱ्या यातना विषद करताना ज्योतिबा-व्यभिचारासवें व्यसनी अम्मल।भार्येची अक्कल गुंग केली॥दारूच्या नादांत मूढ खर्च करी।करीतो भिकारी मुलाबाळां॥मद्यपानगृहांच्या वाढीला विरोध करणारे पत्र-महात्मा फुले यांनी पुणे नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्लकेंट यांना १८ जुलै १८८० रोजी पत्र लिहून मद्यपानगृहांच्या वाढीच्या सरकारी धोरणाला ठाम विरोध केला.दूरदृष्टी ठेवून लिहिलेले हे दुर्मिळ पत्र वाचकांच्यासाठी देत आहोत."नगरपालिकेने बराच पैसा खर्च करून लोकांचे आरोग्य सांभाळण्याच्या उद्देशाने बराच मोठा नोकरवर्ग नेमला आहे.तथापि,ज्या पुणे शहराला दारूचे गुत्ते परिचित नव्हते त्यात आत्ता भरवस्तीत दारूचे गुत्ते उघडल्यामुळे लोकांच्या नैतिक अधःपाताची सर्व बीजे पेरली जात आहेत. त्यामुळे शहराचे आरोग्य सांभाळणे हा जो नगरपालिकेचा एक उद्देश आहे त्याला बाधा येत आहे.दारूचे व्यसन हे नागरिकांच्या नैतिक आचरणाला बाधक आहे;एवढंच नव्हे, तर त्यांच्या आरोग्यालाही अतिशय अपायकारक आहे,हे माझे म्हणणे बहुतेक लोक आपल्या खुशीने मान्य करतील.दारूचे गुत्ते शहरात उघडल्यापासून दारूबाजी इतक्या प्रचंड प्रमाणावर वाढली आहे की,त्यामुळे अनेक कुटुंबांचा संपूर्ण नाश झाला आहे आणि या दुर्गुणाला आता शहरात सराईतणा आला आहे.या व्यसनाच्या प्रसाराला काही प्रमाणात तरी आळा बसावा म्हणून मी नगरपालिकेला अशी सूचना करतो की, नगरपालिकेने या दारूगुत्त्यांवर ते ज्या प्रमाणात हानी करतात त्याच प्रमाणात कर बसवावा.मला असे कळते की,कुठल्याही नगरपालिकेने गुत्त्यांवर कर बसविलेला नाही;मात्र त्यांच्यावर मध्यवर्ती सरकारचा कर असतो.या बाबतीत आवश्यक तर नगरपालिकेने चौकशी करावी;मात्र हा ठराव नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवल्यास मी आभारी होईन."आवाहन -म.फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त त्यांची जयंती ,त्यांनी लिहिलेली पुस्तके,ग्रंथ वाचून साजरी करावी.त्यांच्या चरित्रातून आपण स्वतः व्यसनमुक्त होण्याचा संकल्प करून आपल्याबरोबरच आणखी १९९ लोकांना व्यसनमुक्त करण्याच्या अभियानात सहभागी होऊया!क्रांतिबा ज्योतिबा फुले यांना विनम्र शिव अभिवादन !आणि मानाचा मुजरा!!सर्व भारतीयांना जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!!!जय जिजाऊ! जय शिवराय!!जय ज्योतिबा!!!




**डॉ. विकास पाटील,**
**प्रदेश कार्याध्यक्ष,**
मराठा सेवा संघ प्रणित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यसनमुक्ती परिषद, महाराष्ट्र.संचालक, छ.शंभूराजे आधार व्यसनमुक्ती शुगर मुक्ती मार्गदर्शन केंद्र, सैनिक टाकळी,जि.कोल्हापूर.
मो. ९८८११७२८८९.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ एप्रिल २०२६


# महात्मा जोतिराव फुले यांचे सामाजिक क्रांतीकार्य

**भा**रतीय समाज परिवर्तनाच्या इतिहासात महात्मा जोतिराव फुले हे नाव एका तेजस्वी, धाडसी आणि दूरदृष्टी असलेल्या समाजक्रांतिकारकाचे प्रतीक म्हणून उभे राहते. ११ एप्रिल हा त्यांचा जन्मदिन केवळ स्मरणाचा दिवस नसून, तो समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. महात्मा फुले यांनी भारतीय समाजातील खोलवर रुजलेल्या विषमतेच्या रचनेला आव्हान देत एक नवीन सामाजिक दृष्टिकोन निर्माण केला. त्यांच्या कार्याचा मूलभूत आधार हा मानवमुक्ती, समता, शिक्षण आणि न्याय या मूल्यांवर आधारित होता. त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजातील दुर्बल, वंचित आणि शोषित घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केला.महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. त्या काळात जातिव्यवस्थेचे वर्चस्व इतके प्रबळ होते की, खालच्या जातीतील लोकांना शिक्षण, सामाजिक प्रतिष्ठा आणि संधी यांपासून वंचित ठेवले जात होते. अशा वातावरणात वाढत असताना जोतिरावांना लहानपणापासूनच सामाजिक अन्यायाची जाणीव झाली. शिक्षण घेत असताना त्यांना अनुभवलेल्या अपमानास्पद घटनांनी त्यांच्या मनात प्रश्न निर्माण केले की मानव मानवामध्ये भेद का? काही लोकांना उच्च का मानले जाते आणि काहींना नीच का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा त्यांचा प्रवास पुढे समाजक्रांतीच्या मार्गावर घेऊन गेला.महात्मा फुले यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. त्यांच्या मते, शिक्षणामुळेच अज्ञान, अंधश्रद्धा आणि गुलामीची मानसिकता दूर होऊ शकते. म्हणूनच त्यांनी सर्वप्रथम शिक्षणाच्या क्षेत्रात काम सुरू केले. विशेषतः स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत त्यांनी घेतलेला पुढाकार ही त्या काळातील सर्वात मोठी सामाजिक क्रांती होती. त्यांनी आपल्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या घटनेने भारतीय समाजाच्या इतिहासात एक नवा अध्याय सुरू झाला. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे सामाजिक नियमांचे उल्लंघन मानले जात होते. स्त्रियांना घराच्या चौकटीतच राहण्याची सक्ती होती. शिक्षण मिळाल्यास त्या बंडखोर बनतील, अशी भीती समाजातील उच्चवर्णीयांना वाटत होती. अशा परिस्थितीत महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत धाडसाने हे कार्य हाती घेतले. सावित्रीबाई फुले शाळेत जाताना लोक त्यांच्यावर दगडफेक करत, चिखल फेकत, अपमानास्पद शब्द वापरत; पण त्यांनी या सर्व अडचणींना तोंड देत आपले कार्य अखंडपणे सुरू ठेवले. या संघर्षातून स्त्रीशिक्षणाची चळवळ अधिक बळकट झाली. महात्मा फुले यांनी केवळ मुलींसाठीच नव्हे, तर अस्पृश्य आणि वंचित घटकांसाठीही शाळा सुरू केल्या. त्यांनी समाजातील सर्व स्तरांतील लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या या कार्यामुळे शिक्षण हे काही विशिष्ट वर्गापुरते मर्यादित राहिले नाही, तर ते सर्वांसाठी खुले झाले. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजात समतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला.महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे जातिव्यवस्थेचा निषेध होय. त्यांनी जातिव्यवस्थेला मानवी प्रगतीसाठी सर्वात मोठा अडथळा मानले. त्यांच्या मते, ही व्यवस्था केवळ सामाजिक अन्यायच नव्हे, तर मानसिक गुलामी निर्माण करते. त्यांनी या व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करण्यासाठी १८७३ साली 'सत्यशोधक समाज' या संस्थेची स्थापना केली. सत्यशोधक समाजाचा असा उद्देश होता की समाजातील सत्य शोधणे, अज्ञान आणि अंधश्रद्धा दूर करणे, आणि समता व बंधुता प्रस्थापित करणे.सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी धार्मिक आणि सामाजिक प्रथांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विवाहसंस्थेतही बदल घडवून आणले. सत्यशोधक पद्धतीने विवाह करण्यासाठी प्रोत्साहित केले. यामुळे समाजातील खालच्या स्तरातील लोकांना सन्मानाने विवाह करण्याची संधी मिळाली.महात्मा फुले यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन. त्यांनी स्त्रीला केवळ घरगुती जबाबदाऱ्यांपुरती मर्यादित न ठेवता, तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले, बालविवाहाला विरोध केला आणि स्त्रियांच्या सन्मानासाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांनी अनाथ मुलांसाठी आणि विधवांसाठी आश्रयस्थाने सुरू केली, ज्यामुळे अनेकांना नवीन जीवन मिळाले. महात्मा फुले यांच्या कार्यात मानवतेचा गाभा होता. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला समानतेने वागवण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये जात, धर्म, लिंग या आधारांवर भेदभावाला कोणतेही स्थान नव्हते. त्यांनी समाजातील लोकांना जागृत करण्यासाठी लेखनाचाही प्रभावी वापर केला. 'गुलामगिरी' या ग्रंथात त्यांनी जातिव्यवस्थेवर प्रखर टीका केली. त्यांनी या ग्रंथाच्या माध्यमातून समाजातील शोषणाच्या रचनेला उघड केले.समाजसुधारणेच्या क्षेत्रात महात्मा जोतिराव फुले यांनी केलेले कार्य केवळ शिक्षण, स्त्रीसमानता किंवा जातिव्यवस्था यापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी समाजाच्या आर्थिक पायाभूत रचनेलाही गंभीरपणे स्पर्श केला. त्यांच्या मते, सामाजिक अन्यायाचा पाया हा आर्थिक विषमतेत दडलेला आहे. त्यामुळे समाजातील शोषण समजून घेण्यासाठी आर्थिक संरचनेचे विश्लेषण आवश्यक आहे. त्यांनी शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांच्या जीवनस्थितीचे सखोल निरीक्षण करून त्यांच्या समस्यांना वाचा फोडली.महात्मा फुले यांच्या काळात भारतात ब्रिटिश सत्तेचा प्रभाव वाढत होता. ब्रिटिशांच्या महसुली धोरणांमुळे शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. जमीन महसूल वसुलीची कठोर पद्धत, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती आणि बाजारपेठेतील अस्थिरता यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत चालले होते. या परिस्थितीचे वास्तव चित्र उभे करण्यासाठी महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखद परिस्थितीचे जिवंत चित्रण केले आहे. 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये त्यांनी केवळ शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या नाहीत, तर त्या अडचणींच्या मुळावरही प्रहार केला. त्यांनी दाखवून दिले की, शेतकऱ्यांचे शोषण केवळ ब्रिटिश सत्तेमुळेच नव्हे, तर स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या, सावकारांच्या आणि उच्चवर्णीयांच्या वर्चस्वामुळेही होते. शेतकरी हा उत्पादन करणारा असूनही त्याला त्याच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळत नव्हते. त्यामुळे तो कायमच कर्जाच्या जाळ्यात अडकून राहत होता. महात्मा फुले यांच्या मते, शेतकरी हा समाजाचा कणा आहे. जर शेतकरी सुखी नसेल, तर समाजाची प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता, त्यावर ठोस उपाय सुचवले. त्यांनी सरकारने शेतकऱ्यांना न्याय्य दर द्यावा, महसुली धोरणे सुलभ करावी आणि सावकारी प्रथेवर नियंत्रण ठेवावे, असे मत मांडले. त्यांच्या विचारांमध्ये शेतकरी कल्याणाचा स्पष्ट दृष्टिकोन दिसून येतो.महात्मा फुले यांनी कामगार वर्गाच्या समस्यांकडेही लक्ष दिले. औद्योगिकीकरणाच्या सुरुवातीच्या टप्प्यात कामगारांचे शोषण होत होते. कमी वेतन, जास्त कामाचे तास आणि असुरक्षित कामाच्या अटी यामुळे कामगारांचे जीवन अत्यंत कठीण झाले होते. महात्मा फुले यांनी कामगारांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि त्यांच्या सन्मानासाठी लढा दिला. त्यांच्या विचारांमध्ये कामगारांना न्याय्य वागणूक मिळावी, हा मूलभूत दृष्टिकोन होता. महात्मा फुले यांच्या आर्थिक विचारांचा संबंध त्यांच्या सामाजिक विचारांशी घट्ट जोडलेला होता. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, सामाजिक समता आणि आर्थिक समता या एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. जर समाजात आर्थिक विषमता असेल, तर सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी आर्थिक न्यायाला सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा घटक मानले.महात्मा फुले यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी केलेले लेखन होय. त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी लेखनाचा प्रभावी वापर केला. 'गुलामगिरी' हा त्यांचा अत्यंत प्रसिद्ध ग्रंथ आहे. या ग्रंथात त्यांनी जातिव्यवस्थेवर प्रखर टीका केली आहे. त्यांनी या ग्रंथाच्या माध्यमातून समाजातील शोषणाची रचना उघड केली आणि लोकांना विचार करण्यास प्रवृत्त केले. 'गुलामगिरी' मध्ये त्यांनी अमेरिकेतील गुलामगिरी आणि भारतीय समाजातील जातिव्यवस्था यांची तुलना केली. त्यांनी दाखवून दिले की, भारतीय समाजातील खालच्या जातींची स्थिती ही गुलामांप्रमाणेच आहे. या तुलनेमुळे समाजातील लोकांना आपल्या परिस्थितीची जाणीव झाली आणि त्यांनी परिवर्तनासाठी प्रयत्न सुरू केले. महात्मा फुले यांच्या लेखनात तर्कशुद्धता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद यांचा संगम दिसतो. त्यांनी अंधश्रद्धा, विषमता आणि सामाजिक अन्याय यांवर प्रखर प्रहार केला. त्यांच्या लेखनामुळे समाजात विचार करण्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. त्यांनी लोकांना केवळ माहिती दिली नाही, तर त्यांना जागृत केले.महात्मा फुले यांच्या कार्याचा प्रभाव केवळ भारतापुरता मर्यादित नाही. त्यांच्या विचारांमध्ये सार्वत्रिक मानवतावाद आहे, जो जगातील कोणत्याही समाजासाठी लागू होऊ शकतो. त्यांनी मांडलेले समतेचे तत्त्वज्ञान हे आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही तितकेच महत्त्वाचे आहे. सामाजिक न्याय, मानवाधिकार आणि समता या मूल्यांच्या संदर्भात त्यांचे विचार आजही मार्गदर्शक ठरतात.आजच्या काळात शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्याय या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांच्या आर्थिक आणि सामाजिक विचारांचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजात अधिक न्याय्य आणि समतावादी व्यवस्था निर्माण करू शकतो. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेताना, आपण त्यांच्या विचारांची सखोलता आणि व्यापकता लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी केवळ समाजातील समस्यांचे निदान केले नाही, तर त्यावर उपायही सुचवले. त्यांच्या कार्यामुळे समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आणि आजही ती प्रेरणादायी आहे.भारतीय समाजातील स्त्रीच्या स्थानाचा प्रश्न हा अत्यंत गुंतागुंतीचा आणि संवेदनशील आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी या प्रश्नाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे, तर क्रांतिकारी दृष्टिकोनातून पाहिले. त्यांच्या मते, समाजातील खऱ्या प्रगतीसाठी स्त्रीची मुक्ती अत्यावश्यक आहे. स्त्री शिक्षित, स्वावलंबी आणि आत्मसन्मानी झाली, तरच समाजातील समता आणि न्यायाची पायाभरणी मजबूत होऊ शकते. म्हणूनच त्यांनी स्त्रीमुक्तीला आपल्या कार्याच्या केंद्रस्थानी ठेवले.त्या काळात भारतीय समाजात स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. बालविवाह, विधवांचे अमानुष जीवन, स्त्रीशिक्षणाचा अभाव, आणि पुरुषप्रधान मानसिकता यामुळे स्त्रिया दुय्यम दर्जाच्या नागरिकांप्रमाणे जगत होत्या. विशेषतः विधवांचे जीवन अत्यंत दुःखदायक होते. त्यांना समाजात कोणताही सन्मान नव्हता, त्यांच्यावर अनेक बंधने लादली जात आणि त्यांचे जीवन एक प्रकारची शिक्षा बनत असे. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी विधवा प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले. महात्मा फुले आणि त्यांच्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांनी विधवांसाठी आश्रयस्थाने सुरू केली. त्या काळात विधवांना समाजात राहणेही कठीण होते. अनेक वेळा त्यांना घरातून बाहेर काढले जात असे किंवा त्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत जगावे लागे. अशा महिलांसाठी सुरक्षित आणि सन्मानाचे जीवन मिळावे, यासाठी फुले दांपत्याने मोठे प्रयत्न केले. त्यांनी विधवांना केवळ आश्रय दिला नाही, तर त्यांना आत्मनिर्भर बनवण्याचा प्रयत्न केला.महात्मा फुले यांनी बालविवाहाला कठोर विरोध केला. त्यांच्या मते, बालविवाहामुळे स्त्रियांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते, तसेच त्यांच्या शिक्षणाचा आणि विकासाचा मार्ग बंद होतो. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांना नवीन जीवनाची संधी मिळावी, यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या विचारांमुळे समाजात हळूहळू बदल घडू लागला. महात्मा फुले यांच्या स्त्रीमुक्तीच्या विचारांमध्ये केवळ सामाजिक सुधारणा नव्हती, तर एक व्यापक सांस्कृतिक परिवर्तनाची दिशा होती. त्यांनी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांच्या मते, स्त्री ही पुरुषाची गुलाम नसून समाजाच्या प्रगतीची समान भागीदार आहे. त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडून समाजातील पारंपरिक संकल्पनांना आव्हान दिले.महात्मा फुले यांच्या कार्याचा सांस्कृतिक परिणामही अत्यंत व्यापक होता. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी आणि परंपरांना प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे लोकांमध्ये तर्कशुद्धता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला. त्यांनी धार्मिक विषमता आणि कर्मकांड यांना विरोध करून समाजात नवीन विचारांची बीजे पेरली.आजच्या आधुनिक समाजातही स्त्रियांच्या समस्यांचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. स्त्रीशिक्षणात वाढ झाली असली, तरी लिंगभेद, अत्याचार, आर्थिक असमानता आणि सामाजिक भेदभाव अजूनही अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांच्या स्त्रीमुक्तीच्या विचारांची पुनरावृत्ती करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण स्त्रीसमानतेच्या दिशेने अधिक प्रभावी पावले उचलू शकतो.महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या स्त्रीमुक्तीच्या कार्याचा विचार करताना, त्यांच्या धैर्याची आणि दूरदृष्टीची जाणीव होते. त्यांनी समाजातील सर्वात कठीण आणि संवेदनशील प्रश्नांवर काम केले आणि त्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आणि आजही ती प्रेरणादायी आहे. त्यांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी आणि सन्मान मिळाला पाहिजे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ एक आदर्श संकल्पना नसून, ती समाजाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. त्यांच्या कार्याचा खरा सन्मान म्हणजे त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे आणि समाजात समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे.आजच्या काळात महात्मा फुले यांच्या विचारांची उपयुक्तता अधिक अधोरेखित होते. आधुनिक समाजात तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक विकास यांमध्ये प्रगती झाली असली, तरी सामाजिक विषमता अजूनही अस्तित्वात आहे. जातीयता, लिंगभेद, आर्थिक असमानता आणि सामाजिक अन्याय या समस्या अजूनही आपल्या समाजात दिसून येतात. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.शिक्षणाच्या क्षेत्रात आजही अनेक आव्हाने आहेत. शिक्षणाची गुणवत्ता, सर्वांसाठी समान संधी, आणि शिक्षणातील असमानता हे प्रश्न आजही उपस्थित आहेत. महात्मा फुले यांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व लक्षात घेता, आजच्या काळातही शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्तेचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण शिक्षण क्षेत्रात अधिक समतोल आणि न्याय्य व्यवस्था निर्माण करू शकतो. स्त्रीसमानतेच्या संदर्भातही महात्मा फुले यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. स्त्रियांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सन्मान मिळत असला, तरी अजूनही अनेक ठिकाणी त्यांना भेदभावाचा सामना करावा लागतो. महात्मा फुले यांच्या स्त्रीमुक्तीच्या विचारांचा अवलंब करून आपण या समस्यांवर अधिक प्रभावी उपाय शोधू शकतो. महात्मा फुले यांच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी दिलेला तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन. आजच्या माहितीच्या युगातही अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुती समाजात अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करू शकतो.महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेताना, आपण त्यांच्या दूरदृष्टीची जाणीव करतो. त्यांनी ज्या समस्या त्यांच्या काळात ओळखल्या, त्या आजही अनेक प्रमाणात अस्तित्वात आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा अभ्यास आणि त्यांची अंमलबजावणी आजच्या काळात अधिक आवश्यक आहे. भारतीय समाजाच्या दीर्घकालीन परिवर्तन प्रक्रियेत महात्मा जोतिराव फुले यांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक घटनेपुरते मर्यादित न राहता, एक जिवंत विचारधारा म्हणून आजही आपल्या समोर उभे आहे. त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे समकालीन संदर्भात पुनर्मूल्यांकन करणे ही आजच्या काळाची अत्यंत गरज आहे. कारण समाज बदलला असला, आधुनिकतेची झळाळी वाढली असली, तरी विषमता, अन्याय आणि शोषणाच्या समस्या विविध स्वरूपांत अजूनही अस्तित्वात आहेत.महात्मा फुले यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ सामाजिक स्तरापुरती मर्यादित नव्हती, तर ती सर्वांगीण होती. त्यांनी शिक्षण, अर्थकारण, लिंगसमानता, धर्म आणि संस्कृती या सर्व क्षेत्रांमध्ये समतेचा आग्रह धरला. आजच्या काळात 'समावेशक विकास' ही संकल्पना मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. परंतु, या संकल्पनेचा मूलाधार महात्मा फुले यांच्या विचारांमध्येच दिसून येतो. त्यांनी ज्या प्रकारे समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, असा आग्रह धरला, तो आजच्या धोरणनिर्मितीसाठीही मार्गदर्शक ठरू शकतो.आजच्या समाजात शिक्षणाची व्याप्ती वाढली असली, तरी शिक्षणातील विषमता अजूनही कायम आहे. ग्रामीण-शहरी दरी, आर्थिक असमानता, डिजिटल विभाजन आणि गुणवत्तेतील तफावत या समस्या अजूनही जाणवतात. महात्मा फुले यांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व लक्षात घेतले, तर आपल्याला जाणवते की, शिक्षण हे केवळ साक्षरतेपुरते मर्यादित नसून, ते विचारक्षमतेचा विकास करणारे साधन आहे. त्यामुळे आजच्या शिक्षणव्यवस्थेतही त्यांच्या विचारांचा समावेश करणे आवश्यक आहे.महात्मा फुले यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक पिढ्यांवर पडला आहे. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या विचारांना पुढे नेले आणि भारतीय समाजात सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक बळकट केली. डॉ. आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना आपले प्रेरणास्थान मानले आणि त्यांच्या कार्याला पुढे नेण्याचे काम केले. त्यामुळे महात्मा फुले यांची परंपरा आजही जिवंत आहे.समकालीन काळात महात्मा फुले यांच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करताना, आपण त्यांच्या कार्यातील समता, बंधुता, न्याय आणि मानवता या मूलभूत मूल्यांकडे लक्ष दिले पाहिजे. ही मूल्ये आजच्या समाजासाठीही तितकीच आवश्यक आहेत. जागतिकीकरणाच्या युगात, जिथे विविध संस्कृती, धर्म आणि विचारसरणी एकत्र येत आहेत, तिथे समतेचा आणि सहिष्णुतेचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.समारोप करताना असे म्हणता येईल की, महात्मा जोतिराव फुले हे केवळ एका काळातील समाजसुधारक नव्हते, तर ते एक शाश्वत विचारप्रवाह आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजात समतेची आणि न्यायाची बीजे पेरली गेली. आज त्या बीजांचे वृक्ष झाले आहेत, पण त्यांची निगा राखण्याची जबाबदारी आपली आहे. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून आपण एक अधिक समतावादी, न्याय्य आणि मानवतावादी समाज निर्माण करू शकतो. अशा या महान समाजक्रांतिकारकाला त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना, आपण त्यांच्या आदर्शांचा स्वीकार करून समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प करूया.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

bagate.rajendra5@gmail.com